सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२४ प्र.क्र.२८०/ सेवा-४(का.१३-अ) दि.०९/०९/२०२६

**विषय:-** मृत संवर्ग घोषित केलेल्या लघुलेखक संवर्गातील पदे भरण्यासाठी एक वेळची विशेष बाब म्हणून एका वर्षाची मुदतवाढ देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२४ प्र.क्र.२८०/- सेवा-४(का.१३-अ) दि.०९/०९/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०९०९१७२६३८५४०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Anita Pitambar Rathod
Date: 24-09-2026
16:34:50

( अनिता राठोड )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), (नियोजन व समन्वय) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**मृत संवर्ग घोषित केलेल्या लघुलेखक संवर्गातील पदे भरण्यासाठी एक वेळची विशेष बाब म्हणून एका वर्षाची मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: प्रानिमं १२२४/प्र.क्र.२८०/सेवा-४(का.१३-अ)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०२६.

**वाचा: -**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-प्रानिमं १२२४/प्र.क्र.२८०/सेवा-४(का.१३अ), दिनांक ५ मे, २०२६.

**प्रस्तावना: -**

राज्य शासनाने पदभरती प्रक्रिया अधिक गतिमान, पारदर्शक, सुसूत्रित आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने विविध महत्त्वपूर्ण सुधारणा हाती घेतल्या आहेत. प्रशासनिक कामकाजात, शासकीय व्यवहारात, माहिती-तंत्रज्ञान कार्यप्रणालीचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढलेला आहे. प्रशासकीय पुनर्रचना, आधुनिक तंत्रज्ञान या पार्श्वभूमीवर लघुलेखन/श्रुतलेखन आधारित कामकाजावर तंत्रज्ञानाधारित साधनांचा प्रभावी पर्याय उपलब्ध झाल्याने या सुधारणांचा एक भाग म्हणून शासन निर्णय दि. ५ मे, २०२६ अनुसार "लघुलेखक" संवर्ग मृत घोषित करण्यात आला.

तथापि, लघुलेखक संवर्गातील पदांवर नियुक्तीसाठी "विद्यार्थी वर्षानुवर्षे परिश्रम घेत असल्याने लघुलेखक संवर्ग "मृत संवर्ग" घोषित करण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करुन रिक्त पदांची नियमित पदभरती करावी" अशा आशयाची निवेदने मा. लोकप्रतिनिधी, विद्यार्थी संघटना, यांच्याकडून शासनास प्राप्त झाली आहेत. शासन निर्णय दि. ५ मे, २०२६ च्या परिच्छेद ४ अंतर्गत येणाऱ्या "परिशिष्ट २६" मध्ये नमूद मृत घोषित केलेल्या "लघुलेखक" संवर्गासंबंधीच्या तरतूदीस एक वेळची विशेष बाब म्हणून एका वर्षाची स्थगिती देवून "लघुलेखक" संवर्गातील पदांची भरती पूढील एक वर्षाच्या कालावधीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

शासन निर्णय दि. ५ मे, २०२६ च्या परिच्छेद ४ अंतर्गत येणाऱ्या "परिशिष्ट २६" मध्ये नमूद मृत घोषित केलेल्या "लघुलेखक" संवर्गासंबंधीच्या तरतूदीस एका वर्षाची स्थगिती देण्यात येत आहे. मृत घोषित केलेल्या "लघुलेखक" संवर्गातील पदे दि. ५ मे, २०२६ रोजीच्या शासन निर्णयापूर्वी अस्तित्वात असलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार भरण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून पूढील एक वर्षाचा कालावधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर स्थगिती शासन निर्णय दि. ५ मे, २०२६ च्या परिच्छेद ४ अंतर्गत येणाऱ्या "परिशिष्ट २६" मध्ये नमूद मृत घोषित केलेल्या "लघुलेखक" संवर्गासाठी फक्त एक वेळची विशेष बाब म्हणून भरतीप्रक्रिया राबविण्याकरिता मर्यादित असेल.

३. तसेच ही स्थगिती यासंबंधीचा ***शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पुढील एक वर्षाच्या कालावधीकरिता मर्यादित असून*** तद्नंतर उक्त शासन निर्णयामध्ये नमूद "परिशिष्ट २६" मधील "लघुलेखक" संवर्ग "मृत संवर्ग" असेल.

४. या शासन निर्णयाद्वारे मृत घोषित केलेल्या "लघुलेखक" संवर्गातील विद्यमान रिक्त पदे दि. ५ मे,

२०२६ रोजीच्या शासन निर्णयापूर्वी अस्तित्वात असलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार भरण्यासाठी देण्यात आलेला एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर दि. ०५ मे, २०२६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी लागू राहतील. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी आवश्यकतेनुसार लघुलेखक संवर्गातील पदांचे मागणीपत्र विहित कालावधीत, नियुक्ती प्राधिकारीनिहाय, विहित नमुन्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे त्वरीत पाठवावे.

५. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०५ मे, २०२६ रोजीच्या शासन निर्णयातील इतर सर्व तरतुदी यथास्थिती कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२६०९०९१७२६३८५४०७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2026.09.09 17:27:31 +05'30'

**(सु. मो. महाडिक)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०० ०३२
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
३) मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
४) मा. उप मुख्यमंत्री (रा.ऊ.शु./अल्पसंख्याक/क्रिडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
५) सर्व मा. मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
६) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई
७) सर्व मा. संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
८) सर्व मा. विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
९) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
१०) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
११) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना) त्यांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.
१२) "प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१३) *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१४) 'प्रबंधक, लोक आयुक्त यांचे कार्यालय
१५) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
१६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई
१८) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई
१९) 'राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
२०) 'सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
२१) 'महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई
२२) 'महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई
२३) 'महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र/नागपूर

२४) 'महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र/नागपूर

२५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता ५ प्रती)

२६) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२

२७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

२८) सर्व जिल्हाधिकारी

२९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

३०) सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख / प्रादेशिक विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख-(मंत्रालयीन विभागामार्फत)

३१) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई- ४०००३२

३२) निवडनस्ती.

**ई-मेलद्वारे**

****